# सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी

महाराष्ट्र राज्य सरकारच्या सहकार विभागामार्फत राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी करण्याची मोहिम सुरू झालेली आहे. अर्थात त्यामध्ये सर्व पतसंस्थांचा देखील समावेश आहे. सर्व सहकारी संस्थांनी आपली विहीत नमुन्यातील माहिती ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३१/०७/२०१३ पुर्वी नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.



ऑनलाईन नोंदणी करणेसाठी सर्व पतसंस्थांना माहिती व्हावी, मार्गदर्शन व्हावे व आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे ह्या कारणास्तव ह्या अग्रलेखाद्वारे माहिती देत आहोत. सहकारी संस्थांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी प्रत्येक संस्थेचा ईमेल आय डी असणे आवश्यक आहे. जर पतसंस्थांनी ईमेल आय डी प्राप्त केला नसेल तर तो त्वरीत नोंदणी करून प्राप्त करूण घ्यावा.

एकदा ईमेल आय डी प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या https://mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जावे. या वेबसाईटवर गेल्यानंतर आवश्यक त्या निर्देशानुसार पुढील कृती करावी. या वेबसाईटवर ऑनलाईन जी माहिती अपलोड करावयाची आहे ती खालील प्रमाणे.

१. संस्थेचा नोंदणी क्रमांक. (आवश्यक आहे)
२. संस्थेचा नोंदणी दिनांक (आवश्यक आहे)
३. संस्था प्रकार (आवश्यक आहे)
४. संस्थेचे नाव (आवश्यक आहे)
५. संस्थेचा वर्ग (आवश्यक आहे) ( या संदर्भात वेबसाईटवर माहिती दिलेली आहे.)
६. संस्था कोड (आवश्यक आहे) ( या संदर्भात वेबसाईटवर माहिती दिलेली आहे.)
७. संस्थेचा पत्ता (आवश्यक आहे)
८. संस्थेचा सध्याचा पत्ता हा नोंदणी वेळच्या पत्यापेक्षा वेगळा असेल तर त्याची माहिती.
९. संस्थेचा ईमेल आय डी

१०. संस्थेचा दुरध्वनी क्रमांक ( असल्यास)
११. संस्थेचा भ्रमणध्वनी क्रमांक (आवश्यक आहे)
१२. संस्थेचे कार्यक्षेत्र
१३. सभासद कार्यक्षम संख्या ( ९७ व्या घटनादुरूस्ती तरतुदीनुसार)
१४. गाळे संख्या (म्हणजेच संस्थेच्या शाखांची संख्या)
१५. सभासद संख्या
१६. सभासद निष्क्रिय संख्या ( ९७ व्या घटनादुरूस्ती तरतुदीनुसार)
१७. संस्थेच्या अध्यक्षाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक
१८. संस्थेच्या सचिवाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक
१९. लिक्वीडेटर असल्यास त्याचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक
२०. एकूण समिती सदस्य (म्हणजेच संचालक मंडळ सदस्यांची संख्या)
२१. कार्यकारणी समितीचा कार्यकाळ (महिन्यांमध्ये)
२२. मागील लेखापरिक्षण झाल्याचा दिनांक
२३. लेखापरिक्षण वर्ग (आवश्यक आहे)
२४. मागील निवडणुक दिनांक
२५. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा दिनांक
२६. लेखापरिक्षण वर्ष (आवश्यक आहे)
२७. वसुल भाग भांडवल (आवश्यक आहे)

वरील सर्व माहिती अचूकपणे भरून पतसंस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे. आणि ते अपलोड केल्यानंतर **समावेश करा** या सदरात क्लिक करावे. क्लिक केल्यानंतर संस्थेचा ऑनलाईन नोंदणी क्रमांक आपणास प्राप्त होईल तो संस्थेच्या दफ्तरी ठेवण्यात यावा. किंबहूना तो ऑनलाईन केलेला क्रमांक संचालक मंडळाच्या सभेमध्ये माहितीसाठी ठराव रूपाने सर्व संचालकांना व कर्मचाऱ्यांना अवगत करून द्यावा जेणेकरूण आपल्या पतसंस्थेची ऑनलाईन माहिती भरून झालेली आहे हे सर्वांना माहित होईल.

ह्याप्रमाणे सर्व पतसंस्थांनी ऑनलाईन नोंदणी जरूर करावी व वेळेत करावी. ह्या संदर्भात

मार्गदर्शन व त्याच्या प्रशिक्षणासाठी आपल्या **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुबई** ने ऑनलाईन नोंदणी कक्ष सुरू केलेला आहे. कृपया ह्यास्तव **फेडरेशनचे व्यवस्थापक श्री. युवराज मुळुक** (भ्रमणध्वनी क्रमांक - ९८२०२५४६६६) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहान करण्यात येत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**